प्रकरण पाचवे

# महाराष्ट्रातील लोकशाही समाजवादी विचार- एक चिकित्सक अभ्यास

## प्रकरण पाचवे

# महाराष्ट्रातील लोकशाही समाजवादी विचार : एक चिकित्सक अभ्यास

भारतातील लोकशाही समाजवादी विचारांमध्ये महाराष्ट्रातील लोकशाही समाजवादी विचारवंतांचे व नेत्यांचे मोलाचे योगदान आहे. भारतातील समाजवादी चळवळीमध्ये महाराष्ट्रातील नेत्यांनी महत्वाची भूमिका बजावली. भारतातील लोकशाही समाजवादाचा विचार या विचारवंतांनी भारतीय परिस्थितीत विकसीत केला. १९४० ते १९६० या काळांमध्ये हा विचार समर्थपणे मांडण्यात आला. यामध्ये मुख्यतः तीन वैचारिक प्रवाह विकसित झालेले दिसतात. यातील पहिला प्रवाह गांधी व मार्क्स यांच्या विचारांचा समन्वय करणारा होता. दुसरा प्रवाह डॉ. लोहिया यांनी मांडलेल्या वर्ग आणि जाती याबाबतचा होता. आणि तिसरा प्रवाह हा अशोक मेहता यांच्या विचारांचा होता.

प्रस्तुत प्रबंधामध्ये महाराष्ट्रातील लोकशाही समाजवादी विचारवंतांनी जे योगदान केले त्याचा अभ्यास करण्यात आला आहे. मुख्यतः आचार्य जावडेकर अशोक मेहता आणि साने गुरुजी यांच्या विचारांचा यात अभ्यास करण्यात आला आहे. डॉ. लोहिया यांना महाराष्ट्रात खूप अनुयायी मिळाले. पण डॉ. लोहिया यांच्या विचारांचे विवेचन विश्लेषण व विकास फारसा झाला नाही. मधू लिमये, फर्नांडिस, मृणाल गोरे, बाबा आढाव, सदाशिव बागाईतकर, भाई वैद्य वगैरे बुध्दिमान अनुयायी मिळूनही डॉ. लोहिया यांच्या विचारांचा विकास येथे झाला नाही. महात्मा फुले व डॉ. आंबेडकर यांच्या जातीव्यवस्था विषयक विचारांच्या संदर्भात हे विवेचन खरे तर मूलगामी झाले असते. १९३४ साली कॉंग्रेस समाजवादी पक्षाची स्थापना झाली. ब्रिटीश साम्राज्यवादापासून मुक्तता व भारतात समाजवादी समाजाची स्थापना हे या पक्षाचे ध्येय होते. महाराष्ट्रात एस. एम्. जोशी, अच्युतराव पटवर्धन, अशोक मेहता, युसूफ मेहेरअली इ. नेते या पक्षात सामील झाले. या

नेत्यांनी अखिल भारतीय समाजवादी पक्षाचे नेतृत्व केले. महाराष्ट्रात या पक्षाला चांगला पाठिंबा मिळाला. महाराष्ट्रातील गोवा मुक्ती चळवळ, संयुक्त महाराष्ट्राची चळवळ, भूमिगत चळवळ या चळवळींमध्ये या पक्षाने महत्वाची भूमिका बजावली.

लोकशाही समाजवादी विचारवंतांचे साम्यवादी व गांधीवादी या दोन्ही विचारांशी मतभेद होते. पण या दोन्हीतील लोकशाही व समाजवादाला अनुकूल विचारांचा समन्वय साधण्याचा त्यांचा प्रयत्न होता. १९४८ साली समाजवादी पक्ष स्थापन झाल्यानंतर या पक्षाला आचार्य जावडेकर, आचार्य भागवत आणि साने गुरुजी यांच्यासारख्या थोर बुध्दीवंतांनी पाठिंबा दिला.

**आचार्य जावडेकर यांचा सत्याग्रही समाजवाद -**

आचार्य जावडेकरांनी गांधी व मार्क्स यांच्या विचारांचा समन्वय करुन 'सत्याग्रही समाजवाद' नावाचे तत्त्वज्ञान मांडले. आचार्य जावडेकरांच्या मते सत्याग्रही समाजवादाचे तत्वज्ञान हे एक स्वतंत्र तत्त्वज्ञान आहे. गांधीवाद व मार्क्सवाद या परस्परविरोधी विचारप्रणाली असल्या तरी या दोहोंनाही शेवटी शोषण विरहीत समाज स्थापन करणे अभिप्रेत आहे. या साच्यावरच भर देऊन जावडेकरांनी या दोन्ही विचारप्रणालींचा समन्वय साधण्याचा प्रयत्न केला. यासाठी त्यांनी मार्क्सवाद व गांधीवादाची स्वतंत्रपणे चिकित्सा केली आणि त्यांच्यात समन्वय करुन सत्याग्रही समाजवादाचे नवे तत्वज्ञान मांडले.

सत्याग्रही तत्वज्ञान हे पाश्चात्य देशातील व्यक्तिवाद, राष्ट्रवाद व समाजवाद यापैकी कोणत्याही एका तत्वज्ञानाशी समानरुप नाही. ते एक स्वतंत्र राजकीय व सामाजिक तत्वज्ञान आहे. तथापि व्यक्तिवाद, राष्ट्रवाद व समाजवाद या तत्वज्ञानापैकी कोणकोणती तत्वे कोणत्या आणि किती स्वरुपात मान्य होण्यासारखी आहेत त्याचा विचार त्यांनी केला.

आचार्य म्हणतात, ''ज्यांना सत्य आणि अहिंसा यांची खरी उपासना करावयाची असेल त्यांनी समाजवादी बनले पाहिजे आणि ज्यांना खरा समाजवाद हवा असेल त्यांनी सत्याग्रही बनले पाहिजे.

आचार्य जावडेकरांनी १९२१ मध्ये राजकारणात प्रवेश केला. तेंव्हापासून १९३७ सालापर्यंत टिळक संप्रदाय व गांधी संप्रदाय यांच्यात तीव्र वैचारिक संघर्ष चालू होता. जावडेकर हे गांधीवादी असले तरी त्यांनी आपल्या समन्वय वृत्तीला अनुसरुन असे प्रतिपादन केले की, टिळकांच्या राजकारणाचा खराखुरा वारसा गांधींच्याच वाटयाला आला आहे. समाजक्रांतीचा मार्ग म्हणून गांधीवादाचा विकास समाजवादाच्या दिशेने व्हावा, समाजवादावाचून सत्याग्रहाचे साफल्य होऊ शकत नाही. त्याचप्रमाणे अहिंसेशिवाय माणुसकीची बंधने पाळणे अशक्य असून अहिंसाधिष्ठीत मानवतेशिवाय केवळ मार्क्सवादाचा अर्थप्रधान दृष्टिकोन नवसमाज निर्मितीसाठी अपुरा आहे. या कारणांमुळे गांधीवाद व मार्क्सवाद यांच्या समन्वयावर अधिष्ठीत झालेला सत्याग्रही समाजवाद आवश्यक आहे. असा जावडेकरांच्या प्रतिपादनाचा आशय आहे. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर शासनसंस्था समाजवाद्यांच्या हातात सोपवून सत्याग्रही विचारांच्या व अहिंसक आचारांच्या मानवतावादी सेवकांनी सत्तेपासून दूर राहून विशुध्द मार्गांनी जनतेला संघटीत करण्याचे कार्य हाती घ्यावे असा दृष्टिकोन शेवटी जावडेकरांनी प्रतिपादीत केला होता.

**अशोक मेहता -**

अशोक मेहता हे मूलतः लोकशाहीवादी व व्यक्तिस्वातंत्र्यवादी होते. स्वातंत्र्य चळवळीत त्यांना अनेक वेळा तुरुंगात जावे लागले काँग्रेस अंतर्गत स्थापन झालेल्या काँग्रेस समाजवादी पक्षाच्या स्थापनेत त्यांनी पुढाकार घेतला. शेतकरी व कामगार यांच्या

प्रश्नांविषयी त्यांना विशेष आस्था होती. त्यांचा अनेक मजूर संघटनांशी घनिष्ठ संबंध होता. राजकारण, अर्थकारण, लोकशाही, समाजवाद, नियोजन इ. अनेक विषयांवर वैचारिक लेखन केले आहे.

अशोक मेहतांच्या राजकीय जीवनाचे चार भाग पडतात. पहिल्या भागामध्ये ते स्वातंत्र्य चळवळीमध्ये आणि काँग्रेस समाजवादी पक्षामध्ये सामील झाले आणि काँग्रेस समाजवादी पक्षाच्या वैचारिक जडणघडणीमध्ये त्यांनी महत्वाची भूमिका बजावली. त्यांच्या राजकीय जीवनाचा दुसरा टप्पा १९४२ साली समाजवादी पक्ष स्थापन झाल्यानंतर सुरु झाला. या काळात मुंबईच्या कामगार चळवळीमध्ये त्यांनी मोलाची भूमिका बजावली. समाजवादी पक्षाच्या वैचारिक आणि संघटनात्मक विकासाला त्यांची मोलाची भूमिका होती. आयुष्याच्या तिसऱ्या टप्यात त्यांनी प्रजा समाजवादी पक्षाचा त्याग केला आणि ते १९६३ साली काँग्रेस पक्षात सामील झाले. या काळात प्रथम नियोजन मंडळाचे उपाध्यक्ष व नंतर नियोजनमंत्री म्हणून त्यांनी श्रीमती इंदिरा गांधींच्या सरकारमध्ये काम पाहिले. अशोक मेहतांचे कार्यक्षेत्र प्रामुख्याने मुंबई व सोलापूर हे होते. मराठी भाषिक जनतेशी त्यांची नाळ जोडलेली होती. म्हणून त्यांचा महाराष्ट्रातील लोकशाही समाजवादी विचारवंतांमध्ये समावेश केला आहे. आपल्या लोकशाही समाजवादावरील अत्यंत अभ्यासपूर्ण भाषणांमधून अशोक मेहता यांनी भारतीय संसदीय लोकशाही समाजवादाची मांडणी केली. त्यांच्या मांडणीत अर्थशास्त्रीय विचार प्रभावी असल्यामुळे त्यांनी अविकसीत देशामध्ये विकासासाठी विरोधी पक्षांनी सरकारशी सहयोग करावा असे विचार मांडले. अशोक मेहता यांच्यावर म. गांधी यांचा प्रभाव असला तरी त्यांचा लोकशाही समाजवाद बराचसा युरोपीय वळणाचा आहे आणि त्यामध्ये समाजवादी समाज स्थापन करण्यासाठी आर्थिक विकास कशा प्रकारे घडवून आणता येईल याचा विचार केला आहे.

समाजवादी विचारवंतांत अशोक मेहता हे एक महत्वाचे विचारवंत होते. कारण त्यांना देशापुढे असणाऱ्या आर्थिक समस्यांची चांगली जाण होती व त्यांचा अर्थशास्त्राचा व तत्त्वज्ञानाचा गाढा अभ्यास होता. त्यांनी लोकशाही समाजवादाचा जो विचार मांडला त्यात अहिंसात्मक मार्गाने परिवर्तन करण्याबरोबरच समाजवादी आशय आर्थिक धोरणात कसा आणायचा याचे विवेचन केले. त्यांच्या समाजवादी विचारांवर युरोपीय लोकशाही समाजवादी विचारांचा विशेषतः ब्रिटीश लेबर पार्टीच्या समाजवादी विचारांचा मोठा प्रभाव होता. त्यामानाने म. गांधींचा प्रभाव कमी होता. त्यांचा भर लोकशाही समाजवादाची शास्त्रीय मांडणी करण्यावर होता.

**साने गुरुजी -**

साने गुरुजी हे असामान्य व लोकविलक्षण लेखक व कार्यकर्ते होते. पारतंत्र्यामुळे त्यांच्या मनात संतापाची ज्वाला उफाळली होती आणि त्याच वेळी स्वातंत्र्य लढयातील सहकाऱ्यांबद्दल त्यांच्या मनात स्नेहाची फुले अक्षय बहरलेली होती. साने गुरुजी उपेक्षितांच्या आणि दलितांच्या दुःखाने व्यथीत होत आणि मुलांच्या सहवासात आनंदाने फुलून जात. कोकणातला निसर्ग आणि खानदेशातील धडपडणारी मुले यांच्यावर गुरुजींचे मन जडले होते. साने गुरुजी एक सांस्कृतिक प्रभाव स्त्रोत होते.

साने गुरुजींनी लोकशाही समाजवादी विचारांचा पाठपुरावा केला. त्यांचा वैचारिक प्रवासात त्यांच्यावर म. गांधी, कार्ल मार्क्स यांचा प्रभाव होता. सुरुवातीला कामगार चहवळीत काम करणारे साने गुरुजी कम्युनिष्टांच्या धोरणांना कंटाळून समाजवादी चळवळीकडे आकृष्ट झाले. ते शेवटपर्यंत लोकशाही समाजवादी विचारांशीच एकनिष्ठ राहिले. संस्कृती व धर्म याबाबत त्यांनी मांडलेले विचार आणि त्याचा समाजवादी अन्वयार्थ

महत्वाचा आहे. आचार्य जावडेकर, अशोक मेहता आणि साने गुरुजी यांनी लोकशाही समाजवादी विचारांचे विवेचन केले. पण महाराष्ट्रात अच्युतराव पटवर्धन, एस. एम. जोशी, ना. ग. गोरे व मधू लिमये यांच्यासारखे पहिल्या दर्जाचे नेते झाले. त्यांनी आपल्या जीवनात अनेक चहवळीत भाग घेतला. लिखाण केले. त्यांच्या योगदानाबाबत आपणास खालील गोष्टी सांगता येतील.

महाराष्ट्राच्या लोकशाही समाजवादी चळवळीच्या कार्यामध्ये अच्युतराव पटवर्धन, एस. एम. जोशी, ना. ग. गोरे व मधू लिमये या राजकीय नेत्यांनी व विचारवंतांनी महत्वाची भूमिका बजावली पण त्यांनी तत्वचिंतनपर लिखाण केले नाही.

**अच्युतराव पटवर्धन -**

अच्युतराव पटवर्धन हे अखिल भारतीय पातळीवरचे पुढारी होत. अतिशय खोल अशी जिज्ञासा, तीक्ष्णबुध्दी व सखोल असा अभ्यास हे अच्युतरावांचे वैशिष्ट होते. त्यांच्या मनावर जे. कृष्णमूर्ती यांच्या विचारांचा प्रभाव पडला होता. १९३० सालच्या सत्याग्रहात अच्युतरावांनी प्रथम भाग घेतला होता. १९४२ च्या भूमिगत चहवळीचे नेतृत्व अच्युतरावांनी केले. काँग्रेस- समाजवादी पक्षाच्या स्थापनेत अच्युतरावांचा महत्वाचा वाटा आहे. सातारच्या प्रतिसरकारच्या चळवळींशी अच्युतरावांचा संबंध होता.

१९४३ मध्ये 'क्रांतीकारी' नावाच्या भूमिगत मासिकाचे अच्युतराव संपादक होते. अच्युतराव पटवर्धन हे प्रथमपासून समाजवादी विचारांचे होते. त्यांचे समाजवादावर खूप चिंतन आणि मनन चालत असे.

त्यांच्या प्राथमिक वैचारिक काळात त्यांच्यावर कार्ल मार्क्सचा प्रभाव होता. परंतु स्वातंत्र्य चळवळीत भाग घेतल्यानंतर गांधीजींच्या विचारसरणीचाही त्यांनी बारकाईने

अभ्यास केला. १९४२ ते १९५० या काळात समाजवादी पक्षाच्या बांधणीमध्ये त्यांची मोलाची भूमिका होती. १९३४ ते १९५२ पर्यंत समाजवादी पक्षाचे काम पाहिल्यानंतर त्यांनी पक्षाला रामराम ठोकला आणि सक्रीय राजकारणापासून ते दूर राहिले.

अच्युतरावांनी भारतातील जातीवादाची समस्या यावर लिखाण केले आणि बऱ्याच बाबतीमध्ये त्यांनी मूलगामी असे चिंतन केले. पक्षाचा राजीनामा दिल्यानंतर त्यांनी जयप्रकाशजींना जे पत्र लिहिले त्या पत्रात त्यांनी राजीनाम्याच्या कारणांची मीमांसा केली आहे. अच्युतराव म्हणतात, ''आपल्या तारुण्यात आपल्या पिढीतील विचारवंतांनी केवळ व्यक्तिवाद व उदारमतवादी तत्त्वज्ञान स्वीकारुन आपल्यामध्ये असलेल्या सामाजिक दोषांचे परिमार्जन होणार नाही. त्याचप्रमाणे व्यक्तिगत मुक्तीतून आपल्याभोवती जी सामाजिक विषमता पसरलेली आहे. तिचे निराकरण होणार नाही. या वेचारिक बैठकीमुळे सामाजिक तत्त्वज्ञानाचे रुपांतर सत्तेच्या तत्वज्ञानात झाले. त्यामुळे कोणत्याही मार्गाने सत्ता मिळविणे हे एकमेव उद्दिष्ट ठरले. याचा अपरिहार्य परिणाम म्हणून टगेगिरीचे उदात्तीकरण झाले व अल्पसंख्यांकांची क्रांती वगैरे कल्पना पुढे आल्या. पक्षा पक्षांचे संबंध व पक्षांतर्गत संबंध यांच्यामध्ये एक सामाजिक घरसगुंडी सुरु झाली व आपल्या सामाजिक जीवनाचा पाया ठिसूळ झाला. त्यामुळे राजसत्तेचा उदो उदो झाला व दुसऱ्या बाजूस बंधुभावाचा आभास निर्माण झाला. मतभेदांतील सहिष्णुतेचा अस्त झाला. या पार्श्वभूमीवर राजसत्तेच्या पाशवी शक्तीचा उपयोग करुन सामाजिक बदल घडविले जातात असा समज झाला. त्यामुळे मानवी मन व भावना या दुर्लक्षित होऊन त्यांच्याकडेसुध्दा राजकीय सत्तेची उद्दिष्टे या दृष्टीने पाहण्यात येऊ लागले. त्यामुळे राजकीय पक्ष हे मूठभर लोकांच्या व धंदेवाईक क्रांतीकारकांच्या हातातले बाहुले बनले व त्याला सामाजिक तत्त्वज्ञान हे गोंडस नाव देण्यात आले. यामुळे लाखो लोकांचा राजकीय तत्त्वज्ञानाबध्दल भ्रमनिरास झाला व राजकारणाबद्दल ते उदासीन झाले आहेत. त्यामुळे समाजातील अन्याय व सामाजिक

विषमता दूर करावयाची आहे. त्यांना पर्याय उपलब्ध होत नाही म्हणून राजकीय सत्तेच्या दृष्ट चक्रातून नवीन सामाजिक अभिसरण सुरु होण्यासाठी दुसरा पर्याय शोधला पाहिजे. मात्र असा पर्याय माझ्याजवळ नाही. सद्यःस्थितीत असलेल्या अनिश्चिततेतून कायमस्वरुपी मार्ग काढावा लागेल. परंतु हे व्यक्तिगत उद्दिष्ट होऊ शकत नाही. त्याला सामाजिक आशय प्राप्त झाल्याखेरीज खरी फलनिष्पत्ती होणार नाही.[२] नंतरच्या काळात अच्युतरावांनी रचनात्मक कार्य केले. त्या काळात त्यांनी बरेचसे चिंतन केले. ते म्हणतात, ''मी कधीच मार्क्सवादी नव्हतो. खरे तर मी कधी गांधीवादीही नव्हतो. मी मारुन मुटकून समाजवादी होतो. स्वातंत्र्य आंदोलनात आलो ते सुध्दा एका श्रध्देने ती श्रध्दा म्हणजे इंग्रज निघून गेले की आपल्या देशात स्वर्गच अवतरेल आणि दैन्य दारिद्रय नाहीसे होईल असा माझा समज होता तो खोटा ठरला. मग मला वाटले की समाजवादाने प्रश्न सुटतील, गरीबी हटेल, एक नवीन समाज निर्माण होईल पण हा समजही खोटा ठरला. अशा रितीने दोनदा फसगत झाल्याने आता नवीन विवंचना मला नको आहे.''

''जनतेच्या हितासाठी आपल्या नैसर्गिक साधनसंपत्तीचे स्वामित्व समाजाकडे असले पाहिजे यावर माझा विश्वास होता. या संपत्तीचे वाटप आणि नियोजन करताना जनतेचे व्यापक हितच लक्षात घेतले पाहिजे परंतु कालांतराने सोव्हीएट युनियनमध्ये पुष्कळच आडाखे चुकले हे लक्षात आले. एके काळी भांडवलशाहीपेक्षा शासनाची भांडवलशाही श्रेयस्कर आहे असे माझे मत होते पण उत्पादनाची सर्व साधने सरकारच्या मालकीची असण्यातही काही धोके संभवतात हे प्रथम माझ्या ध्यानात आले नव्हते. शेवटी शासनही एखाद्या पक्षाचे असते त्यामुळे शासनाचे हितसंबंध याचा अर्थ विशिष्ट राजकीय पक्षाचे हितसंबंध असाच हेतो. त्यामुळे उतपादनाच्या साधनांच्या स्वामित्वात फेरबदल करून आपले प्रश्न सुटणार नाहीत.''

सरकारीकरण झालेल्या उद्योगांची दयनीय अवस्था पाहून अच्युतरावांचा पूर्ण भ्रमनिरास झाला होता. समाजवादाचे आधीचे विचार तपासून पाहिले पाहिजेत ही त्यांची भावना होती. ते म्हणतात, ''पूर्वी आम्हाला असे वाटत होते की कोणत्याही समाजाची चौकट बदलण्यात विशिष्ट ध्येयाचा वा ध्येयवादाचा सहभाग आवश्यक व महत्वाचा असतो. परंतु आता असे दिसते की या बदलाचे काम तंत्रज्ञानच तत्वज्ञानापेक्षा जास्त वेगाने करीत आहे.'' अच्युतराव पुढे म्हणतात की, ''कोटयावधी शेतकरी म्हणजे देशाच्या अर्थकारणाचा कणा आहे. त्याच्या कल्याणासाठी शासनाला कधीकधी आपले हितसंबंधही मागे ठेवावे लागतात. जेथे जेथे शासनयंत्रणेने शेतकऱ्यांचे कृषीउद्योग काढून घेतले तेथे तेथे विनाश ओढवलेला आहे. साम्यवादी रशियाचे उदाहरण आपल्या डोळयासमोर आहे. बँकांच्या राष्ट्रीयीकरणाबाबतही त्यांनी मत व्यक्त केले. ते म्हणतात की, ''बँकांच्या राष्ट्रीयीकरणाचा मी एकेकाळी पुरस्कर्ता होतो. पण प्रत्यक्ष अनुभव मात्र निराळा आहे. सरकारच्या अर्थसंस्था सत्ताधारी बिनदिक्कत वापरतो आणि निकोप औद्योगिक विकासाऐवजी आपल्या संकुचित हितावर त्याचा डोळा असतो. बँकांच्या राष्ट्रीयीकरणाचे उदात्त ध्येय सत्ताधारी पक्ष आपल्या स्वार्थासाठी करील याची मला कल्पना नव्हती.'' त्यामुळे अच्युतराव म्हणतात की, ''कोणतीही शासनयंत्रणा विनाशकारी असते. आजच्या जगात मुख्य प्रश्न आहे तो राजसत्ता, राजकारणसत्ता आणि गुडांनी काबीज केलेले पक्ष, यांच्यावर नियंत्रण ठेवण्याचा आजकाल सर्वच राजकीय पक्षात आपला नेता सहमतीने निवडण्याची प्रवृत्ती वाढत चाललेली आहे. पण हे ढोंग आहे असे अच्युतरावांचे मत आहे. ते म्हणतात की, ''या सहमतीचा खरा अर्थ असा आहे की, सर्व बडया दादांचे निमूटपणे ऐकावयाचे. यासाठी पुराव्याची आवश्यकता नाही. कोणत्याही मतापेक्षा सत्य हे श्रेष्ठ असते. सहमती ही एका अर्थाने निवडणुकीची लोकशाही प्रक्रिया उल्लंघण्याची युक्ती आहे यात संशय नाही.''

अच्युतरावांच्या विचारात वरीलप्रमाणे परिवर्तन झाले असले तरी त्यांची समाजाशी बांधीलकी अतूट होती. समाज परिवर्तनाचा कोणताही विचार त्यांच्या मनातून जात नसे.

## एस. एम्. जोशी -

भारतातील समाजवादी चळवळीत त्यागी वृत्तीने आयुष्यभर काम करणारे एस. एम्. जोशी हे एक नेते होते- त्यांनी संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीचेही नेतृत्व केले. उत्तरार्धात एसेम यांनी राष्ट्र सेवा दलाचे जडणघडणीचे काम केले. समाजवादी चळवळीच्या वाटचालीत त्यांनी नेहमीच तत्वनिष्ठ भूमिका घेतली. म. गांधी यांच्या जीवनाचा त्यांच्यावर खास करुन प्रभाव होता. तर कार्ल मार्क्सचे साहित्यही त्यांनी वाचले होते. नाशिकच्या तुरुंगात त्यांनी मार्क्स व गांधी यांचा समन्वय साधून लोकशाही समाजवादी विचार प्रवृत्त केला. त्यांच्यामध्ये एसेम् यांचाही समावेश होता. कॉंग्रेस-समाजवादी पक्षाच्या संस्थापकापैकी ते होत. त्यांनी युसूफ मेहरअलींचे नेतृत्व मानून युथ लिगचेही काम सुरुवातीला केले. लोकमान्य टिळकांच्या जहाल राष्ट्रवादी विचारांचाही त्यावेळी त्यांच्यावर प्रभाव होता. मात्र एसेम यांच्या राष्ट्रवादात मानवतावादाला महत्व होते. देशातील गरीब, श्रीमंत, कामगार हे सर्व राष्ट्राचे महत्वाचे घटक आहेत. म्हणून राष्ट्र विकसीत करण्यासाठी या मानवाचा विकास व संगोपन म्हणजे राष्ट्रवादाचा विकास त्यांना अभिप्रेत होता. गोवा मुक्ती आंदोलनातही एसेम् यांची भूमिका महत्वाची होती.

## ना. ग. गोरे -

लोकशाही समाजवादावर नानासाहेबांची निष्ठा होती. मात्र ती पोथीनिष्ठ कधीच नव्हती. युसूफ मेहरअलींच्या युथ लीगमधून नानासाहेब यांनी आपल्या सार्वजनिक जीवनाचा पाया घातला. १९३० च्या सत्याग्रहात नानासाहेबांनी भाग घेतला होता.

नाशिकच्या तुरुंगात नानासाहेबांची वास्तव्य ऐतिहासिक ठरले. समाजवादी पक्षाच्या स्थापना परिषदेत ना. ग. गोरे यांचा महत्वाचा सहभाग होता. पुढे १९४२ च्या भूमिगत आंदोलनात नानासाहेबांनी भाग घेतला. १९५७ मध्ये ते प्रजासमाजवादी पक्षाचे उमेदवार म्हणून लोकसभेवर निवडून गेले. प्रजासमाजवादी पक्षाचे ते १९६५ मध्ये अध्यक्षही होते. नानासाहेबांचा राजकीय चिड हा मार्क्स, गांधी, फुले, आंबेडकर यांच्या रसायनाने बनलेला होता. सेवा दलातील आणि समाजवादी चळवळीतील कार्यकर्त्यांना दिशा देण्याचे काम त्यांनी केले. नानासाहेब गोरे या समाजवादी विचाराच्या नेत्याला महाराष्ट्राच्या सामाजिक व आर्थिक जीवनात महत्वाचे स्थान होते.

मधू लिमये -

मधू लिमये हे नंतरच्या राजकीय पिढीमधील एक कर्तबगार असे राजकीय पुढारी व विचारवंत होते. लिमयांचा राजकीय पींड जयप्रकाश अच्युतराव व अशोक मेहतास यांच्या विचारांमधून घडलेला नव्हता. त्यांच्या सामाजिक व राजकीय विचारांवर डॉ. राम मनोहर लोहिया यांच्या विचारांचा खोल ठसा उमटलेला होता. त्यानंतर आयुष्यभर मधू लिमये हे डॉ. लोहिया यांचे समर्थक म्हणून काम करताना आपल्याला दिसतात. लिमये यांची बुध्दीमत्ता तीव्र होती. व्यासंग अफाट होता व त्यांनी तत्त्वज्ञान, इतिहास, अर्थशास्त्र यावर अनेक ग्रंथ वाचले होते. पण डॉ. लोहिया यांच्या विचारांना व महाराष्ट्रातील लोकशाही समाजवादी विचारांना पुढे नेण्यात त्यांनी फारसे योगदान केलेले दिसत नाही. आयुष्याच्या शेवटच्या काळात लिमये यांनी लेखन केले. पण त्याचा भर ऐतिहासिक व स्वानुभवावर लिखाण करण्यावर होता. त्यातून फारशी वैचारिक मांडणी झाली नाही.

महाराष्ट्रातील समाजवादी चळवळ अच्युतराव पटवर्धन, अशोक मेहता, युसूफ मेहेरअली, एस. एम्. जोशी व नानासाहेब गोरे यांच्या नेतृत्वाखाली १९३४ ते १९८४ पर्यंत अर्धशतक चालली. १९३४ साली काँग्रेस समाजवादी पक्षाची स्थापना झाली. स्वातंत्र्य म्हणजे केवळ राजकीय स्वातंत्र्य नसून स्वातंत्र्याचे सुराज्यात रुपांतर होऊन समताधिष्टीत राष्ट्राकडे त्याची वाटचाल सुरु झाली पाहिजे अशी या समाजवादी नेत्यांची व विचारवंतांची भूमिका होती. यासाठी श्रमिकांना संघटीत करणे, त्यांच्या हक्कांसाठी संघर्ष करणे हे धोरण होते. या समाजवाद्यांच्या फॅसिझमला कडवा विरोध होता आणि जोपर्यंत इंग्लंड त्याचे साम्राज्य गुंडाळत नाही तोपर्यंत इंग्लंडला लोकशाही राष्ट्र म्हणता येणार नाही असे स्पष्ट मत समाजवाद्यांचे होते. तरुणांच्या मनात स्वातंत्र्याप्रमाणे समतेबद्दलही आकर्षण निर्माण व्हावे या दृष्टीने राष्ट्रसेवादल ही संघटना कार्यरत झाली. साने गुरुजींनी राष्ट्रसेवा दलाच्या माध्यमातून येथील तरुणांवर समाजवादी विचारांचे संस्कार केले.

१९४८ साली समाजवादी काँग्रेस पक्षातून बाहेर पडले. त्यात काही चूक नव्हती. मात्र त्यानंतर काही कालपर्यंत एकजूटीने काम करणे आवश्यक होते ते दुर्देवाने घडले नाही. अच्युतराव पटवर्धन यांनी राजकारण सन्यास घेतला. जयप्रकाश नारायण पक्ष सोडून निघून गेले. अशोक मेहता व डॉ. लोहिया यांच्यातील वादामुळे पक्षात फूट पडली आणि डॉ. लोहिया यांनी स्वतंत्र पक्ष काढला. त्यांचे महाराष्ट्रातील काम मधू लिमये पाहू लागले.

लोकशाही व समाजवाद यांची फारकत करुन चालणार नाही ही समाजवाद्यांची भूमिका योग्य होती. कम्युनिष्ट व समाजवादी यांच्यात हा मुलभूत फरक होता. अशोक मेहता यांच्या भूमिकेमुळे समाजवादी चळवळीचे मोठे नुकसान झाले. कारण आवडी अधिवेशनातील नेहरुंची समाजवादाची घोषणा फक्त आभास निर्माण करणारीच ठरली.

गोवा मुक्ती चळवळ व संयुक्त महाराष्ट्र आंदोलन यामध्ये लोकशाही समाजवादी विचारांचा व कार्यकर्त्यांचा कस लागला. परंतु समाजवाद्यांकडून पुढील काळात काही अपवाद वगळता व्यापक लढे उभारता आले नाहीत. आणी-बाणीविरुध्दच्या आंदोलनात समाजवादी पक्ष देशात व महाराष्ट्रात अग्रेसर राहिला. महाराष्ट्रात समाजवादी पक्षाने कामगार लढे उभारले पण शेतकरी व कामकरी यांच्या चळवळीशी त्यांची युती झाली नाही. शिवाय रिपब्लीकन पक्ष व समाजवादी यांचे ऐक्य घडावयास हवे होते. पण डॉ. आंबेडकरांच्या मृत्यूनंतर ही प्रक्रिया थांबली. यामुळे महाराष्ट्रातील समाजवादी चळवळीचे नुकसान झाले. या दृष्टीने समाजवादी चळवळींचे हे अपयशच म्हणावे लागेल. राजकीय सत्ता मिळविण्यात समाजवादी चळवळ यशस्वी झाली नसती तरी समतेचा विचार रुजविण्यात ती काही अंशी का होईना यशस्वी झाली आहे असे म्हणता येईल.

महाराष्ट्रातील लोकशाही समाजवादी चळवळीतून अनेक विचारवंत व नेते निर्माण झाले. आचार्य जावडेकर व अशोक मेहता यांचे वैचारिक योगदान महत्वाचे ठरले. राजकारणाचा विचार करता अच्युतराव मेहेर अली, एस. एम. जोशी, ना. ग. गोरे, रावसाहेब पटवर्धन, मधू लिमये, जॉर्ज फर्नांडिस, मधू दंडवते, अशोक मेहता इत्यादी अखिल भारतीय कीर्तीचे व कर्तबगारीचे नेते महाराष्ट्रात निर्माण झाले व त्यांनी समाजवादी चळवळीचे नेतृत्व केले. त्यात अच्युतराव पटवर्धन ना. ग. गोरे आणि मधू लिमये यांची बुध्दिमत्ता प्रखर होती, वैचारिक चिंतनाचा त्यांचा आवाका मोठा होता. लिमये आणि गोरे यांनी विपुल लिखाण केले पण लोकशाही समाजवादी विचारांत तात्विक भर घालण्याचे या विचारांची सखोल मांडणी करण्याचे कार्य दुर्देवाने त्यांच्यामध्ये चांगली कुवत असूनही झाले नाही.

संदर्भ -

१. जोशी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री (संपा.), मराठी विश्वकोश, खंड ६, १९७७, पृ. ४३७.

२. लिमये हरिभाऊ, अच्युतराव पटवर्धन, डॉ. राम मनोहर लोहिया स्मृती केंद्र, पुणे, पृ. ४३, ४४.

३. उपरोक्त, पृ. ५८, ५९, ६०.